**अर्जदारातर्फे सा.क्र.१ चा अतिरिक्त सरतपास – श्री. आर. आय. पालकर वकील.**

**१२.** आता मला माझ्या वडिलांनी करुन दिलेले वटमुखत्यारपत्र दाखवले, त्याला **नि. क्र.२५** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**गैरअर्जदारांतर्फे उलट तपास – श्री. ए. एम. सावंत वकील.**

**१३.** माझे बी. ए. पर्यंतचे शिक्षण झाले आहे. हा अर्ज विलंबमाफी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

प्रश्न – आण्णाप्पा भाऊसो धुरे नावाची तुमच्या गावात व्यक्ती आहे काय ?

उत्तर – माझ्या वडिलांना आणाप्पा भाऊसो धुरे या दुस–या नावाने गावामध्ये ओळखतात.

**१४**. माझ्या वडिलांची आण्णाप्पा भाऊसो धुरे या नावाची रेकॉर्डला ब–याच ठिकाणी नोंद आहे. मी त्याबाबतचे कागदपत्रे दाखल करु शकतो.

**१५**. दावा मिळकतीशी माझा वैयक्तिक संबंध नाही. साक्षीदार सांगतो, दावा मिळकतीशी त्याच्या वडिलांचा संबंध आहे. मला माझ्या वडिलांच्या विरोधात गडहिंग्लज वरिष्ठ न्यायालयात दाखल असलेल्या नि. दि. दा. क्र.२७७/२०१२ मध्ये मनाई आदेश असल्याची माहिती नाही. साक्षीदार पुन्हा सांगतो, त्याने त्याच्या वडिलांना विचारले असता, त्यांनी मनाई लागल्याचे सांगितले आहे. मला माझे वडिल त्या दाव्याबाबत प्रत्येक तारखेला हजर राहत असल्याचे सांगता येणार नाही.

**१६**. मला दिलेल्या नि. क्र.२५ च्या वटमुखत्यार पत्रातील मजकूर बरोबर असून मी माझ्या वडिलांकडून त्यातील दावा मिळकतीची माहिती घेतलेली नाही. मला माझ्या वडिलांनी माझ्या व्यतिरिक्त आणखीन कोणाला वटमुखत्यारपत्र दिल्याची माहिती नाही. सर्जेराव अनंतराव धुरे माझा मोठा भाऊ आहे. मला नि. क्र.२५ च्या वटमुखत्याराचा स्टॅंप पेपर कोणी आणला याची माहिती नाही. ते वटमुखत्यारपत्र पालकर वकिलांनी लिहून दिलेले असून त्यातील मजकूर त्यांनी सांगितलेला आहे. ते वटमुखत्यारपत्र गडहिंग्लज येथे लिहिलेले आहे. ते वटमुखत्यारपत्र न्यायालयात नोटरी केलेले आहे. मी त्याबाबतची न्यायालयाच्या आवारात रजिस्टरला स्वाक्षरी केली आहे. त्यावरती माझी एकटयाची

स्वाक्षरी आहे.

**१७**. मला नि. दि. दा. क्र.१३/२०१६ न्यायालयाने काढून टाकेपर्यंत माझे वडिल नियमित हजर होत असल्याची माहिती नाही. मला सदर दावा दाखल तारखेपासून माझे वडिल न्यायालयात जात होते किंवा नाही याची माहिती नाही. मला सदर दाव्याच्या सर्व तारखा सोमवारी असल्याची माहिती नाही. या अर्जातील माहिती माझ्या वडिलांनी वकिलांना दिलेली आहे.

**१८**. दि.०७.०२.२०१९ रोजी माझे वडिल न्यायालयात आले नव्हते. दि. ०६.०२. २०१९ रोजी माझे वडिल चालते–बोलते व फिरु शकत होते. साक्षीदार सांगतो, ते पुर्वीपासून आजारी होते. माझ्या वडिलांवरती डॉ. सुरेश घोरपडे व धुरे उपचार करतात. त्यांच्यावरती आजही त्याच डॉक्टरांकडे उपचार चालू आहेत. मी या प्रकरणामध्ये दि.०७.०२.२०१९ रोजी माझे वडिल आजारी असल्याबाबतची कागदपत्रे दाखल केलेली नाहीत.

**१९**. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा काढून टाकल्याबाबत चुकीचा अर्ज सादर केला आहे. मला दि.२२.०१.२०१९ रोजी माझ्या वडिलांनी गडहिंग्लज न्यायालयातील प्रकरणात शपथपत्र दाखल केल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा अर्ज दाखल केला असून आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – १३.१०.२०२५.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.